महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-६७
COMMISSIONERATE OF ANIMAL HUSBANDRY
स्पायसर मेमोरिअल कॉलेज समोर, औंध पुणे ४११ ०६७
Maharashtra State, Opposite Spicer Memorial College, Aundh Pune ४११०६७
E-Mail : cah.livestockandpoultry@gmail.com Telephone No.-020-25690480, 25690481, 25690485
"पशुधनाच्या आजारावर घरपोच उपचार, एका कॉलच्या अंतरावर: संपर्क टोल फ्री क्रमांक-१९६२"

जा. क्र. प-१/प्र.क्र. ६९५/ 2384 /२०२६, पसं-१३, औंध, पुणे-६७, दि.29/०४/२०२६

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

विषय:- पशुसंवर्धन व्यवसायास "कृषि समकक्ष दर्जा" देणेबाबत...

संदर्भ:- शासन निर्णय क्र. पविआ-०३२५/प्र.क्र.७४/पदुम-३, दि. ३१/०७/२०२५

संदर्भिय शासन निर्णयानुसार पशुपालकांना भेडसावत असणाऱ्या विविध समस्या जसे की कृषी वीज दराच्या तुलनेत जास्त वीज दर, सोलर एनर्जीसाठी अनुदानाचा अभाव, ग्रामपंचायत कर, शेती कर्जाच्या व्याज दराच्या तुलनेत अधिक व्याज दर आकाराणी अशा समस्यांचे निराकरण करण्यासाठी "कृषी समकक्ष दर्जा" लागू करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३ नूसार पशुपालन व्यवसायास स्वतंत्र व्यवसाय न समजता शेती व्यवसाय समजून कृषि व्यवसायास ज्या दराने ग्रामपंचायत कर आकारणी केली जाते त्याच दराने व राज्यभरात समान दराने ग्रामपंचायत कर आकारणी करण्यात येईल असे नमूद आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर आपणास कळविण्यात येते की, आपले स्तरावरुन आपल्या जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना आदेशित करुन सदर शासन निर्णयाच्या प्रभावी अंमलबजाणी करण्यासाठी शासन निर्णयात नोंदविलेल्या निकषानुसार पशुपालन व्यवसाय करणारे पात्र पशुपालक/कुक्कुटपालक व्यवसायीकांना कर सवलतीचा लाभ देण्यात यावा.

(डॉ. किरण पाटील भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन,
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-६७

प्रत माहितीस्तव:

१) प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (सर्व)
२) जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (सर्व)